'पैलतीर' या सदरासाठी

फिनिक्स दि २४ :- येथील महाराष्ट्र मंडळातर्फे वर्षभर विविध मनोरंजक आणि माहितीपूर्ण कार्यक्रम सादर केले जातात. त्याअंतर्गत नुकताच शनिवार २१ जानेवारी रोजी संक्रांतीनिमित्त एक आगळावेगळा कार्यक्रम साजरा करण्यात आला. 'साहित्यकुंज' असे नाव असलेल्या या कार्यक्रमाला फिनिक्समधील जवळजवळ ७० दर्दी रसिक उपस्थित होते.

दोन भागात हा कार्यक्रम सादर करण्यात आला. ~~प्रत्येक~~ ~~कार्यक~~ सुरुवातीला साहित्यकुंज या भागाची संकल्पना स्पष्ट करण्यात आली. काहितरी चांगलं निर्माण करण्यासाठी जे जमवलं जातं ते साहित्य; आणि म्हणूनच आज आपण काहितरी चांगलं या कार्यक्रमातून निर्माण करणार आहोत असं सांगण्यात आलं.

कार्यक्रमाच्या पहिल्या भागात येथील स्थानिक कलाकारांनी आपल्या स्वतःच्या आणि स्वतःच्या आवडीच्या पण इतरांच्या कविता आणि ललित लेखांचं वाचन केलं. तर दुसऱ्या भागात 'ज्ञानपीठ विजेत्या साहित्यिकांना मानवंदना' हा कार्यक्रम या वर्षीच्या कमिटी मेंबर्सनी सादर केला. या कार्यक्रमाअंतर्गत खांडेकरांच्या ललितलेखनातील काही भागांचं वाचन, कुसुमाग्रजांच्या 'आगगाडी आणि जमीन' 'गाभारा' 'कणा' अशा कवितांचं वाचन करण्यात आलं तर विंदांच्या 'सांगीची गझल', 'राणीची बाग', 'समतेचे हे तुफान उठले' अशा काही कविता आणि त्यांच्याही ललितलेखनातला काही भाग सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला रसिकांकडून भरभरून दाद मिळाली.

सुमारे दोन तास रंगलेला हा कार्यक्रम तिळगूळ व कॉफीपानाने संपला.

सौ. नेत्रा अग्निहोत्री
फिनिक्स
यु. एस. ए.